# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे-३७

जा.क्र. : प्रशा/व्य.मं./२०१६/ ३०/०८/२०१६

**कार्यवृत्तांत**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची तातडीची सभा शुक्रवार दि. १२ ऑगस्ट २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे-३७ येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी खालील सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. दीपक ज. टिळक, कुलगुरु (अध्यक्ष)
२. डॉ. गीताली हृषिकेश मोने-टिळक, अधिष्ठाता, आधुनिकशास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये अभ्यासमंडळ
३. डॉ. बा. शि. दामले, अधिष्ठाता, आरोग्यशास्त्र अभ्यास मंडळ
४. डॉ. मा. चिं. दीक्षित, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
५. डॉ. हेमंत अभ्यंकर, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
६. डॉ. श्रीपाद भट, प्राध्यापक प्रतिनिधी
७. डॉ. माधवी रेणावीकर, सहयोगी प्राध्यापक प्रतिनिधी
८. श्रीमती सरीता साठे, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी
९. डॉ. अभिजीत जोशी, प्रभारी कुलसचिव, (सचिव)

डॉ. स. प्र. सरदेशमुख व सौ. प्रणति टिळक हे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत.

१) व्यवस्थापन मंडळाची मागील सभा दि.२८ जुलै २०१६ रोजी झाली. त्या सभेचा कार्यवृत्तांत संमत करणे व केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१५५**

कार्यवृत्तांत संमत करण्यात येत असून केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

२) मा. कुलपती यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार विद्यापीठाच्या कुलगुरू नियुक्ती अर्ज प्रक्रिया सुरू करणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१५६**

कुलगुरू नियुक्ती अर्ज प्रक्रिया सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगास अवगत करण्यात यावे व त्यांच्याकडून नामनिर्देशित प्रतिनिधीच्या नावाच्या शिफारसीबाबत विनंती पत्र त्यांना त्वरीत पाठवावे. तसेच व्यवस्थापन मंडळाच्या वतीने सदर प्रक्रीयेसाठी व्यवस्थापन मंडळाचे नामनिर्देशित प्रतिनिधी म्हणून डॉ.स.प्र.सरदेशमुख यांची एकमताने निवड करण्यात आली. याबाबत त्यांचेकडून संमतीपत्र घेऊन पुढील कार्यवाही सुरू करावी.

३) यु.जी.सी च्या नवीन मार्गदर्शक तत्वे २०१६ नुसार विद्यापीठाचे सुधारित MoA व नियम बनविण्याबाबत विचार करणे
(यु.जी.सी चे दि.२१ जुलै २०१६ चे याबाबतचे पत्र क्र. F.1-3/2016(CPP-I/DU)

**ठराव : व्य.मं.२०१६-१५७**

The Board of Management hereby RESOLVE THAT "As per the legal counsel and legal opinion availed by the Vidyapeeth, the new UGC regulations sought to be implemented vide notification no. F.No.1-3/2016 (CPPPI/DU) dtd 11th July 2016 could be bad in law, illegal and unconstitutional and hence the Vidyapeeth would not be able to implement the same. However in the light of the legal opinion on record, it is resolved that the proper legal remedy for challenging the said provisions in the proper forum to be initiated and the same be intimated to UGC".

४) भारत सरकारच्या स्वयम् व्यासपीठा अंतर्गत विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी MOOCs अभ्यासक्रम सुरू करणेबाबत विचार करणे.
(यु.जी.सी चे दि.२७ जुलै २०१६ चे याबाबतचे पत्र क्र. D.O.F.No.1-100/2016(MOOCs/e-content).

**ठराव : व्य.मं.२०१६-१५८**

मा.कुलगुरू यांच्या निर्देशांन्वये यासाठी स्वतंत्र समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीने विद्यापीठाकडून कोणते अभ्यासक्रम सुरू करता येतील याचा आढावा घेऊन पुढील प्रक्रीया सुरू करण्यात मान्यता देण्यात आली.

५) विद्यापीठाच्या विविध विभागांतर्गत चालविण्यात येणारे प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम स्वयंरोजगार व कौशल्य विकास केंन्द्र यांच्याकडे वर्ग करण्यात येण्याबाबत विचार करणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१५९**

यासाठी स्वतंत्र समिती गठीत करण्यात यावी व स्वतंत्र स्वयंरोजगार व कौशल्य विकास केंन्द्र स्थापन करण्यात यावे. या केंन्द्रामार्फत अभ्यासक्रम सुरू करण्याविषयीचा अहवाल समितीने मा. कुलगुरू यांना सादर करावा व त्यापुढील कार्यवाही समितीच्या शिफारसींनुसार करण्यात यावी. समितीची संरचना खालीलप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १. श्रीमती सरीता साठे | अध्यक्ष |
| २. सौ. गीताली मोने-टिळक | सभासद |
| ३. डॉ.एम.सी.दिक्षित | सभासद |
| ४. डॉ.हेमंत के.अभ्यंकर | सभासद |
| ५. सौ. सुनिता दिघे | समन्वयक |

६) शासकीय शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना केवळ शासन नियमाप्रमाणे पगार देणे बाबत निर्णय घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१६०**

दि.१ ऑक्टोबर २०११ च्या विद्यापीठ विश्वस्त मंडळाच्या सभेच्या ठराव विश्वस्त २०११-३३ नुसार, शासनमान्य पदावरील शिक्षकांना (शासनाकडून आदेश प्राप्त होईपर्यंत) सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे दरमहा देय असलेल्या रकमेपोटी प्राध्यापक - रु.२०,०००/-, सहयोगी प्राध्यापक - रु. १२,०००/- व

सहाय्यक प्राध्यापक - रु. ८,०००/- याप्रमाणे वाढ सप्टेंबर २०११ पेड इन ऑक्टोबर २०११ पासून देण्यात यावी असे ठरले होते. परंतु काही शिक्षकांबाबत ६व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती झाली नाही व त्याबाबत कोणताही खुलासा अजूनही शासनाने केलेला नाही. त्यामुळे अश्या शिक्षकांना वेतनाव्यतरिक्त देण्यात येणारी रक्कम देण्यात येऊ नये. परंतु असे निदर्शनास आले आहे की काही कर्मचाऱ्यांना अजूनही अतिरिक्त वेतनाचा लाभ मिळत आहे. प्र. कुलसचिव व मुख्यलेखापाल यांनी ते मा.कुलगुरू यांच्या निदर्शनास आणून द्यावे व त्वरीत थांबवावे आणि त्याचा अहवाल सादर करावा.

७) विद्यापीठातील खालील कर्मचाऱ्यांविरूद्ध FIR दाखल केली गेली आहे, त्याबाबत विचार करणे.

- डॉ. उमेश केसकर
- श्री. जगदीश साळवे
- श्री. प्रदीप खटावकर
- श्री. मंदार गीतापाठी
- श्री. दिपक देशपांडे
- श्री. राजेश हिले
- श्री. नरेंन्द्र जोशी
- श्री. योगेश लांडगे
- श्री. रविंन्द्र भोसले
- सौ. स्वाती बेल्हे.

## ठराव : व्य.मं.२०१६-१६१

It has come to the notice of the Board that on the charges of unlawful appropriation of Vidyapeeth funds to the tune of Rs. 95,39,308/-, the criminal complaint initiated by the Vidyapeeth has been registered with Swargate Police Station under FIR No. 0263 of 2016 under section 154 of CRPC for charges of criminal breach of trust and cheating, liable to prosecution u/s. 406, 420 and 34of IPC against the following accused :

1. Dr. Umesh Keskar
2. Mr. Jagdish Salve
3. Mr. Pradip Khatavkar
4. Mr. Mandar Gitapathi
5. Mr. Deepak Deshpande
6. Mr. Rajesh Hile
7. Mr. Narendra Joshi
8. Mr. Yogesh Landage
9. Mr. Ravindra Bhosale

10. Mrs. Swati Belhe

It is hereby RESOLVED THAT, "on the basis of this serious criminal offence, departmental enquiry be initiated against all the accused under the relevant Acts applicable to the Vidyapeeth as per MCSR or applicable standing code".

८) संस्कृत कार्यासाठी देणगीदारांनी दिलेल्या देणगीबाबत विचार करणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१६२**

विद्यापीठाच्या प्रचलित नियमाप्रमाणे पुढील १० वर्षांकरीता सदर देणगीच्या व्याजाच्या रकमेतून पारितोषिके देण्यात यावीत. पारितोषिके कुणास दिली याबद्दल दर वर्षी देणगीदारांना अवगत करावे. विद्यापीठातर्फे देणगीदारांना आभारपत्रे देण्यात यावीत.

९) आपल्या विद्यापीठाचे स्वतंत्र 'भरती नियम' तयार करणेबाबत विचार करणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१६३**

आपल्या विद्यापीठातील सहाय्यक कुलसचिव व मुख्यलेखापाल यांची वेतनश्रेणी ही इतर विद्यापीठांच्या तुलनेत कमी असल्याने आपल्या विद्यापीठाचे स्वतंत्र भरती नियम तयार करण्यासंदर्भात मा. कुलगुरू यांना सर्वाधिकार देण्यात आले.

सही/- डॉ. अभिजीत जोशी
प्रभारी कुलसचिव

सही/- डॉ. दीपक ज. टिळक
अध्यक्ष